SAMPLE CONTENT

# मराठी (LL)

# व्याकरण - भाषाभ्यास व उपयोजित लेखन

Based on Textbook and Board Paper Pattern

Secure **40 marks** of Grammar & Writing Skills




प्राची शेंडे
M.Com., C.A.

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.


## Std. X
(ENG. MED.)

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४ यांच्या
अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित.

# मराठी (LL)

# व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन

## इयत्ता दहावी (इंग्रजी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठ्यपुस्तक व अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित.
- कृतिपत्रिका आराखड्यातील भाषाभ्यास विभाग व उपयोजित लेखन विभागासंदर्भातील सविस्तर विवेचन.
- भाषाभ्यास विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण.
- भाषाभ्यास विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव.
- उत्तरे लिहिण्याकरता पर्याप्त जागा उपलब्ध.
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरता उत्तरसूची समाविष्ट.
- उपयोजित लेखनातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत.
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती.
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकामध्ये सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट.
- मार्च २०२३ पर्यंतच्या बोर्ड कृतिपत्रिकांमधील प्रश्नांचा उत्तरांसहित समावेश.

Sample Content

Printed at: : **Print to Print,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 3154**

P.O. No. 8480

# प्रस्तावना

इयत्ता दहावीचे वर्ष हा विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीचा निर्णायक टप्पा असतो. त्यामुळे, परीक्षेत उत्तम गुण मिळवून यशाची दारे उघडण्याचा प्रत्येकाचाच प्रयत्न असतो. भाषेमध्ये आपल्याला अधिकाधिक गुण कसे मिळवता येतील? असा प्रश्न विद्यार्थ्यांच्या मनात येतोच. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी निर्धारित केलेल्या कृतिपत्रिका आराखड्यानुसार मराठी विषयातील तब्बल ४० गुण हे या व्याकरण, भाषाभ्यास व उपयोजित लेखनाला देण्यात आले आहेत. या घटकांचा अभ्यास व सराव ही मराठी विषयाच्या यशाची गुरुकिल्ली निश्चितच ठरू शकेल. विद्यार्थ्यांच्या या यशोमार्गावरील हाच प्रवास सुखकर करण्याकरता, त्यांना खऱ्या अर्थाने भाषेवर प्रभुत्व मिळवता यावे याकरता टार्गेट प्रकाशनाचे **मराठी (LL) व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन इयत्ता दहावी** हे पुस्तक मुलांच्या, हाती सोपवताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

व्याकरण हा भाषेचा पाया असतो. हा पाया मजबूत असेल, तर भाषेचा सुंदर डोलारा येथे उभा करता येतो. व्याकरण व अनेकविध भाषिक घटकांनी भाषा घडलेली असते. त्यांचा अभ्यास करून भाषेवर प्रभुत्व मिळवणे अधिक सोपे होते. शिवाय, व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित प्रश्नांमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवणे सहज शक्य असते; मात्र त्याकरता गरज असते ती व्याकरणिक व भाषिक घटकांमागील मूळ संकल्पना समजून घेऊन त्या घटकांचा पुरेसा सराव करण्याची. विद्यार्थ्यांची हीच गरज लक्षात घेऊन आम्ही या संकल्पना सहज, सोप्या शब्दांत मांडल्या आहेतच. शिवाय, सरावाकरता भरपूर प्रश्न समाविष्ट करून त्यांची उत्तरे लिहिण्याकरताही पुरेशी जागा दिली आहे. या पुस्तकाच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांची व्याकरण व भाषाभ्यासावरील पकड मजबूत होईल असा आम्हांला विश्वास आहे.

'उपयोजित लेखन' हा भाषेचा सृजनात्मक आविष्कार आहे. यातील प्रत्येक घटकाला स्वत:ची अशी एक शैली आहे. ही लेखनशैली पुरेशा सरावाने विकसित करता येते. यादृष्टीने या पुस्तकात उपयोजित लेखन विभागातील प्रत्येक घटकावर आधारित विपुल नमुना कृती देण्यात आल्या आहेत. त्यांचा अभ्यास करून विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती, सृजनशीलता, विचार अभिव्यक्ती, अनुरूप भाषेचा वापर करण्याची क्षमता इत्यादी गुण वाढीस लागतील.

कृतिपत्रिकेतील भाषाभ्यास विभाग व उपयोजित लेखन विभागाचा आराखडा समजावून देऊन ते प्रश्न कसे सोडवावेत याचे सविस्तर विवेचन यात देण्यात आले आहे. त्यामुळे, कृतिपत्रिका सोडवताना काय काळजी घ्यावी, प्रत्येक घटकासाठी निर्धारित केलेले गुण, शब्दमर्यादा, पाळायच्या व टाळायच्या सर्व बाबी मुलांना लक्षात येतील. मागील वर्षांच्या बोर्ड कृतिपत्रिकांमधील प्रश्नांचा उत्तरांसह समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना अभ्यास करताना याचा निश्चितच फायदा होईल.

व्याकरण व भाषाभ्यासावर आधारित भरपूर कृती, २० पत्रे, २२ सारांश, २० जाहिराती, २० बातम्या, २५ कथा आणि तीन निबंधप्रकार मिळून ७५ निबंध एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना ४० गुणांपैकी जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी अक्षरभारती; चौथे पुनर्मुद्रण: २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **भाषाभ्यास** | |
| | कृतिपत्रिका आराखडा | १ |
| | कृतिपत्रिका प्रारूपाचे सविस्तर विवेचन | २ |
| • | **व्याकरण** | |
| १. | वाक्यांचे प्रकार | ३ |
| २. | वाक्यरूपांतर | ७ |
| ३. | वाक्प्रचार | ११ |
| • | **भाषिक घटक** | |
| १. | शब्दसंपत्ती | |
| | • समानार्थी शब्द | १९ |
| | • विरुद्धार्थी शब्द | २५ |
| | • शब्दसमूहाबद्दल एक शब्द | २९ |
| | • वचन | ३४ |
| | • लिंग | ३९ |
| २. | लेखननियमांनुसार लेखन | ४२ |
| ३. | विरामचिन्हे | ५० |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – १ | ५५ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – २ | ५७ |
| | उत्तरे | ५९ |
| | **उपयोजित लेखन** | |
| | कृतिपत्रिका आराखडा | ७१-७३ |
| | कृतिपत्रिका प्रारूपाचे सविस्तर विवेचन | |
| १. | पत्रलेखन | ७४ |
| २. | सारांशलेखन | ९२ |
| ३. | जाहिरातलेखन | १०१ |
| ४. | बातमीलेखन | ११२ |
| ५. | कथालेखन | १२२ |
| ६. | लेखनकौशल्य<br>**(प्रसंगलेखन / अनुभवलेखन)** | |

| | निबंध | पृष्ठ | | निबंध | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १. | इयत्ता १० वी निरोप समारंभ | १३५ | ९. | मी पाहिलेला महापूर | १४० |
| २. | अविस्मरणीय पारितोषिक वितरण समारंभ | १३५ | १०. | मी पाहिलेली जत्रा | १४१ |
| ३. | पावसाळ्यातील एक दिवस | १३६ | ११. | माझा संस्मरणीय वाढदिवस! | १४१ |
| ४. | मराठी भाषा दिन सोहळा | १३७ | १२. | पर्यावरण संवर्धनात आमचा सहभाग | १४२ |
| ५. | आनंददायी पारितोषिक वितरण समारंभ | १३७ | १३. | माझा गिर्यारोहणाचा पहिला अनुभव | १४३ |
| ६. | आमची जंगलसफारी | १३८ | १४. | आमचे स्वच्छता अभियान | १४३ |
| ७. | मी पाहिलेला क्रिकेटचा सामना | १३९ | १५. | शिक्षकदिन समारंभ | १४४ |
| ८. | मी पाहिलेला अपघात | १३९ | १६. | 'बंद' काळातील शहर | १४५ |


Sample Content

| | निबंध | पृष्ठ | | | निबंध | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|---|
| १७. | मी पाहिलेली सर्कस | १४५ | | २०. | माझा फसलेला संकल्प | १४७ |
| १८. | एक अनोखे प्रदर्शन | १४६ | | • | सराव कृती | १४८ |
| १९. | मी पाहिलेला सूर्यास्त | १४७ | | | | |

**(आत्मकथन)**

| | निबंध | पृष्ठ | | | निबंध | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुस्तकाचे आत्मवृत्त | १४९ | | १७. | बाकाचे आत्मकथन | १५९ |
| २. | झाडाचे आत्मकथन | १५० | | १८. | शेतकऱ्याचे मनोगत | १६० |
| ३. | सूर्याचे आत्मकथन | १५० | | १९. | शिक्षकांचे आत्मकथन | १६० |
| ४. | मी क्रीडांगण बोलत आहे | १५१ | | २०. | विहिरीचे आत्मवृत्त | १६१ |
| ५. | भारत देशाचे आत्मवृत्त | १५२ | | २१. | शाळेतील फळ्याचे आत्मवृत्त | १६२ |
| ६. | समाजसेवकाचे आत्मवृत्त | १५२ | | २२. | पक्ष्याचे आत्मवृत्त | १६२ |
| ७. | जंगलाचे आत्मकथन | १५३ | | २३. | पोलिसाचे आत्मवृत्त | १६३ |
| ८. | भारतीय राष्ट्रध्वजाचे आत्मवृत्त | १५४ | | २४. | महामार्गावरील सूचनाफलकाचे आत्मकथन | १६४ |
| ९. | मोबाइलचे आत्मकथन | १५४ | | २५. | संगणकाचे आत्मकथन | १६४ |
| १०. | पृथ्वीचे मनोगत | १५५ | | २६. | सायकलचे आत्मकथन | १६५ |
| ११. | मराठी भाषेचे आत्मवृत्त | १५५ | | २७. | पिंजऱ्यातील वाघाचे आत्मकथन | १६६ |
| १२. | पूरग्रस्ताचे मनोगत | १५६ | | २८. | मुंबई उपनगरी रेल्वेचे आत्मकथन | १६६ |
| १३. | सफाई कामगाराचे आत्मवृत्त | १५७ | | २९. | कोरोनाग्रस्ताचे मनोगत | १६७ |
| १४. | नदीचे आत्मवृत्त | १५७ | | ३०. | प्लॅस्टिकच्या पिशवीचे मनोगत | १६८ |
| १५. | मी आरसा बोलतोय | १५८ | | • | सराव कृती | १६८ |
| १६. | माजी सैनिकाचे आत्मकथन | १५९ | | | | |

**(वैचारिक लेखन)**

| | निबंध | पृष्ठ | | | निबंध | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | युग संगणकाचे | १७० | | १४. | भ्रष्टाचार – एक कलंक | १७८ |
| २. | वर्तमानपत्राचे महत्त्व | १७० | | १५. | वाचाल तर वाचाल | १७९ |
| ३. | निसर्ग आपला गुरु | १७१ | | १६. | मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व | १७९ |
| ४. | झाडे लावा झाडे जगवा | १७२ | | १७. | व्यायामाचे महत्त्व | १८० |
| ५. | राष्ट्रीय एकात्मता | १७२ | | १८. | ऑनलाईन शिक्षण | १८१ |
| ६. | आजचा विद्यार्थी | १७३ | | १९. | पर्यटन-एक आनंद | १८१ |
| ७. | विज्ञान-शाप की वरदान? | १७३ | | २०. | भारत-खेड्यांचा देश | १८२ |
| ८. | अंधश्रद्धा – एक शाप | १७४ | | २१. | बदलती कुटुंबव्यवस्था | १८२ |
| ९. | कोरोना महामारी - मोठे संकट | १७५ | | २२. | भूतदया | १८३ |
| १०. | वाढते प्रदूषण-मोठी समस्या | १७५ | | २३. | प्लॅस्टिक – एक जागतिक समस्या | १८४ |
| ११. | शब्दांचे सामर्थ्य | १७६ | | २४. | आजची स्त्री | १८४ |
| १२. | मानवता-खरा धर्म | १७७ | | २५. | व्यसनाधीनता-एक शाप | १८५ |
| १३. | मोबाइल – शाप की वरदान | १७७ | | • | सराव कृती | १८५ |


Sample Content

# व्याकरण-भाषाभ्यास

Sample Content

Sample Content

## कृतिपत्रिका आराखडा – विभाग ४ - भाषाभ्यास

**एकूण गुण १६**

**(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती** [**एकूण गुण ८**]

**(१) वाक्यप्रकार** – २ गुण

विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्गारार्थी, आज्ञार्थी वाक्य ओळखणे.

**(२) वाक्यरूपांतर** – २ गुण

i. प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर
ii. उद्गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर
iii. आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर
iv. होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

**(३) वाक्प्रचार** (३ देणे व त्यांपैकी २ लिहिणे अपेक्षित) – ४ गुण

(खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे.)

(प्रत्येकी १ गुण अर्थासाठी व १ गुण वाक्यात उपयोगासाठी)

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती** [**एकूण गुण ८**]

**(१) शब्दसंपत्ती** – ४ गुण

(१) समानार्थी शब्द
(२) विरुद्धार्थी शब्द
(३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द
(४) एकवचन – अनेकवचन
(५) लिंग बदलणे

} यांपैकी कोणत्याही ४ घटकांवर प्रत्येकी १-१ गुणांच्या ४ कृती विचारणे अपेक्षित

**(२) लेखननियमांनुसार लेखन** – २ गुण

(१) अचूक शब्द ओळखा. (कोणतेही दोन शब्द-प्रत्येकी ४ पर्यायांसह देणे. चार पर्यायांपैकी १ शब्द अचूक देणे)

**किंवा**

(२) दोन वाक्य देणे. (प्रत्येक वाक्यात लेखननियमांनुसार दोन चुकीचे शब्द देणे, ते शब्द दुरुस्त करून लिहिणे अपेक्षित)

**(३) विरामचिन्हे** – २ गुण

योग्य विरामचिन्हे वापरा किंवा विरामचिन्हे ओळखा.

[महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४]

Sample Content

## कृतिपत्रिका प्रारूपाचे सविस्तर विवेचन – विभाग ४ - भाषाभ्यास

**प्र.४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.** **[एकूण गुण ८]**

कृतिपत्रिकेत भाषाभ्यास विभागातील **प्र.४. (अ)** मध्ये एकूण ८ गुणांसाठी व्याकरण घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील. यात समावेश असणारे व्याकरणिक घटक गुणविभागणीसह पुढीलप्रमाणे:

१. वाक्यप्रकार **२ गुण**

यामध्ये विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्गारार्थी किंवा आज्ञार्थी वाक्ये देऊन वाक्याचा प्रकार ओळखायचा आहे. प्रत्येकी १ गुणासाठी २ वाक्ये विचारण्यात येतील.

२. वाक्यरूपांतर **२ गुण**

यामध्ये 'दिलेल्या सूचनेनुसार वाक्यांचे रूपांतर करणे', या प्रकारची कृती विचारण्यात येईल. यात पुढील प्रकारचे रूपांतर विचारण्यात येईल.

i. प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर
ii. उद्गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर
iii. आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर
iv. होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

प्रत्येकी १ गुणासाठी २ वाक्ये विचारण्यात येतील.

३. वाक्प्रचार **४ गुण**

यामध्ये 'दिलेल्या वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे' या प्रकारची कृती विचारण्यात येईल. तीन वाक्प्रचार देण्यात येतील व कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे अपेक्षित आहे.

(अर्थासाठी प्रत्येकी १ गुण व वाक्यात उपयोगासाठी १ गुण)

यातील सर्वच कृती अनिवार्य असून येथे विकल्प देण्यात येणार नाही. फक्त वाक्प्रचारांच्या कृतीमध्ये अंतर्गत विकल्प आहे.

**प्र.४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.** **[एकूण गुण ८]**

कृतिपत्रिकेतील भाषाभ्यास विभागात **प्र.४. (आ)** मध्ये एकूण ८ गुणांसाठी भाषिक घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील. यात समावेश असणारे भाषिक घटक गुणविभागणीसह पुढीलप्रमाणे:

१. शब्दसंपत्ती **४ गुण**

यामध्ये समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शब्दसमूहाबद्दल एक शब्द, एकवचन – अनेकवचन, लिंग बदलणे या घटकांपैकी कोणत्याही ४ घटकांवर कृती विचारण्यात येतील. १-१ गुणांच्या ४ कृती विचारणे अपेक्षित आहे. प्रत्येक घटकामध्ये प्रत्येकी १/२ गुणांच्या दोन कृतींचा किंवा १ गुणाच्या एका कृतीचा समावेश असेल.

२. लेखननियमांनुसार लेखन **२ गुण**

यामध्ये पुढील कृती विचारण्यात येतील:

अचूक शब्द ओळखा (कोणतेही दोन शब्द प्रत्येकी ४ पर्यायांसह देण्यात येतील.)

वाक्य लेखननियमांनुसार लिहा (दोन वाक्ये देण्यात येतील. प्रत्येक वाक्यात लेखननियमांनुसार दोन चुकीचे शब्द देण्यात येतील व ते दुरुस्त करून लिहिणे अपेक्षित आहे.)

प्रत्येक अचूक शब्दाला १/२ गुण व वाक्यातील चुकीच्या शब्दाच्या दुरुस्तीसाठी १/२ गुण दिला जाईल.

३. विरामचिन्हे **२ गुण**

यामध्ये 'योग्य विरामचिन्हे वापरा' किंवा 'विरामचिन्हे ओळखा' हे कृतिप्रकार विचारण्यात येतील.

यामध्ये प्रत्येकी १ गुणासाठी दोन वाक्ये देण्यात येतील.

यातील सर्वच कृती अनिवार्य असून येथे विकल्प देण्यात येणार नाही.

Sample Content

# १ वाक्यांचे प्रकार

**आपल्या मनातील विचार भावना, कल्पना व्यक्त करण्यासाठी आपण शब्दांचा वापर करतो. अशा शब्दांचा अर्थपूर्ण समूह म्हणजे वाक्य होय.**

**उदा.** 'तू मी तरच आलास येईन' हे वाक्य नाही कारण त्या वाक्यातून अर्थबोध होत नाही; परंतु हे शब्द योग्य क्रमाने लिहिले असता, 'तू आलास तर मी येईन.' असे अर्थपूर्ण वाक्य तयार होते. मराठीमध्ये या वाक्यांचे रचनेच्या दृष्टीने आणि अर्थाच्या दृष्टीने असे दोन प्रकार आहेत. यावर्षी आपण वाक्यांचे अर्थाच्या दृष्टीने असलेले प्रकार अभ्यासणार आहोत.

| क्र. | वाक्याचे प्रकार (अर्थाच्या दृष्टीने) | ओळखण्याची खूण |
|---|---|---|
| १. | विधानार्थी वाक्य | साधे सरळ विधान |
| २. | प्रश्नार्थी वाक्य | वाक्याच्या शेवटी प्रश्नचिन्ह (?) |
| ३. | उद्गारार्थी वाक्य | केवलप्रयोगी अव्यय किंवा वाक्याच्या शेवटी उद्गारवाचक चिन्ह (!) |
| ४. | आज्ञार्थी वाक्य | आज्ञा, विनंती, हुकूम, प्रार्थना, उपदेश. |

## १. विधानार्थी वाक्य (Assertive Sentence)

ज्या वाक्यांत केवळ विधान केलेले असते, त्याला **विधानार्थी वाक्य** असे म्हणतात.

**उदा.** i. मी माझा दुसरा अनुभव सांगतो. ii. शेवटी मला राहवेना.

## २. प्रश्नार्थी वाक्य (Interrogative Sentence)

या प्रकारच्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो. होय किंवा नाही अशा प्रकारचे उत्तर येणारे प्रश्न किंवा कधी, कुठे, कसे, किती, कोण, कोणी, कोणास, काय याप्रकारचे प्रश्न यात विचारले जातात. वाक्याच्या शेवटी प्रश्नचिन्ह असेल, तर ते निश्चितपणे प्रश्नार्थी वाक्य असते.

**उदा.** i. तुम्ही मला ओळखलेत का? ii. लाडू कधी केलेस तू?

## ३. उद्गारार्थी वाक्य (Exclamatory Sentence)

आपल्या मनात आलेली भावना खूप तीव्र, उत्स्फूर्त असेल, तर ती उद्गार रूपाने बाहेर पडते. आनंद, दु:ख, आश्चर्य, भीती, कौतुक अशा भावना उद्गार रूपाने या वाक्यांत व्यक्त होतात.

या वाक्यात उद्गारचिन्हाचा वापर केला जातो. केवलप्रयोगी अव्ययाचा वापर केला असेल, तर त्यानंतर उद्गारचिन्ह दिलेले असते अथवा वाक्याच्या शेवटी उद्गारचिन्ह दिले जाते.

**उदा.** i. अरेरे! किती जोरात पडला हा! ii. आजचा दिवस म्हणजे तर त्यांच्यासाठी पर्वणीच!

## ४. आज्ञार्थी वाक्य (Imperative Sentence)

या प्रकारच्या वाक्यांत एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला कृती करण्यासाठी आज्ञा किंवा आदेश दिलेला असतो. याशिवाय, आशीर्वाद, विनंती, प्रार्थना, उपदेश अशांसाठी वापरलेली वाक्येसुद्धा आज्ञार्थी असतात.

**उदा.** i. शन्नू, गप्प बस. (आज्ञा) ii. देव सर्वांचे भले करो. (आशीर्वाद)
iii. कृपया ते पेन मला दे. (विनंती) iv. ईश्वरा, जगाचे कल्याण कर. (प्रार्थना)
v. याला ताबडतोब फासावर चढवा. (हुकूम) vi. उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा. (उपदेश)

Sample Content

## सराव कृती

**१. पुढील वाक्यांच्या प्रकाराचा योग्य पर्याय निवडून त्यापुढे ✓ अशी खूण करा.**

i. **सर्वांना खेळ आवडतात.**
अ. आज्ञार्थी ☐ ब. विधानार्थी ☐ क. प्रश्नार्थी ☐ ड. उद्गारार्थी ☐

ii. **तुझे घर कुठे आहे?**
अ. आज्ञार्थी ☐ ब. विधानार्थी ☐ क. प्रश्नार्थी ☐ ड. उद्गारार्थी ☐

iii. **तुम्ही उत्तम खेळावे.**
अ. आज्ञार्थी ☐ ब. विधानार्थी ☐ क. प्रश्नार्थी ☐ ड. उद्गारार्थी ☐

iv. **रामला आंबा आवडत नाही.**
अ. आज्ञार्थी ☐ ब. उद्गारार्थी ☐ क. विधानार्थी ☐ ड. प्रश्नार्थी ☐

v. **काय गातोस तू!**
अ. विधानार्थी ☐ ब. प्रश्नार्थी ☐ क. उद्गारार्थी ☐ ड. आज्ञार्थी ☐

vi. **आमचे रक्षण कर.**
अ. प्रश्नार्थी ☐ ब. आज्ञार्थी ☐ क. विधानार्थी ☐ ड. उद्गारार्थी ☐

vii. **हा साप खूपच मोठा आहे.**
अ. उद्गारार्थी ☐ ब. विधानार्थी ☐ क. प्रश्नार्थी ☐ ड. आज्ञार्थी ☐

viii. **देवाची भक्ती करावी.**
अ. आज्ञार्थी ☐ ब. विधानार्थी ☐ क. प्रश्नार्थी ☐ ड. उद्गारार्थी ☐

ix. **जा आणि परत येऊ नका.**
अ. विधानार्थी ☐ ब. आज्ञार्थी ☐ क. प्रश्नार्थी ☐ ड. उद्गारार्थी ☐

x. **किती लागले तुला!**
अ. प्रश्नार्थी ☐ ब. उद्गारार्थी ☐ क. विधानार्थी ☐ ड. आज्ञार्थी ☐

**२. पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा.**

i. तो खूप चांगला धावतो. – ------------------------------

ii. तुम्ही खेळायला जा. – ------------------------------

iii. मला चालता येत नाही. – ------------------------------

iv. धावल्यामुळे व्यायाम होत नाही का? – ------------------------------

v. प्रवासात भरभरून बोलावे. **[जुलै २०१९]** – ------------------------------

vi. किती सुंदर आहे ताजमहाल! **[जुलै २०१९]** – ------------------------------

vii. तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का? **[मार्च २०२०]** – ------------------------------

Sample content

viii. रनिंगपेक्षादेखील दोरीवरच्या उड्या मारा. **[मार्च २०२०]** – ---

ix. अक्षय दररोज अभ्यास करतो. **[मार्च २०२२]** – ---

x. काही उपयोग होणार नाही. – ---

xi. मस्ती करू नका. **[डिसेंबर २०२०]** – ---

xii. तुम्ही काही झाडे लावली आहेत का? **[डिसेंबर २०२०]** – ---

xiii. राष्ट्रगीताचा मान राखा. **[मार्च २०२३]** – ---

xiv. हुशारीचे किती ते तेज त्याच्या चेहऱ्यावर! **[मार्च २०२३]** – ---

**३. खालील वाक्ये व त्यांचे प्रकार यांच्या जोड्या जुळवा.**

| क्र. | 'अ' गट | उत्तर | | 'ब' गट |
|---|---|---|---|---|
| i. | भज्यांशिवाय पार्टी कसली? | --- | अ. | विधानार्थी वाक्य |
| ii. | रनिंग कर रोज. | --- | ब. | प्रश्नार्थी वाक्य |
| iii. | इश्श! साखरेशिवाय लाडू आमच्या नाही घराण्यात केले कुणी! | --- | क. | उद्गारार्थी वाक्य |
| iv. | मला बोललंच पाहिजे. | --- | ड. | आज्ञार्थी वाक्य |

**४. पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा.**

i. तुझा मित्र कोण आहे? – ---

ii. नियमित अभ्यास करावा. – ---

iii. आत जाण्याचे सर्व मार्ग बंद करा. – ---

iv. किती आनंद झाला तुझ्या भेटीने! – ---

v. अरेरे! फार वाईट झाले! – ---

vi. केवढा मोठा हा प्राणी! – ---

vii. बोलू नका. – ---

viii. देवा मला यश दे. – ---

**५. पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा.**

i. तुला गाणे आवडले का? – ---

ii. अहाहा! किती सुंदर देखावा हा! **[मार्च २०२२]** – ---

Sample Content

iii. खोटे बोलू नये. – ______

iv. परिस्थिती अतिशय बिकट आहे. – ______

v. शी! काय हे कपडे तुझे! – ______

vi. मी शांत झालो. – ______

vii. या तुम्ही. – ______

viii. वा! काय धमाल आली! – ______

**६. पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा.**

i. तो येणार नाही. – ______

ii. तू अशक्त आहेस का? – ______

iii. नेहमी दुसऱ्यांना मदत करा. – ______

iv. जगाला प्रेम द्यावे. – ______

v. वडिलांचा आदर राखा. – ______

vi. किती आनंद झाला त्याला! – ______

vii. वाईट सवयी सोडा. – ______

viii. कैरी आंबट आहे. – ______

ix. आम्ही तुमचे कार्य कसे विसरू? – ______

**७. खाली दिलेल्या चारही प्रकारांतील वाक्यांचे नमुने तयार करा.**

i. विधानार्थी

**उत्तर:** ______

ii. प्रश्नार्थी

**उत्तर:** ______

iii. उद्गारार्थी

**उत्तर:** ______

iv. आज्ञार्थी

**उत्तर:** ______

Sample Content

Page no. **7** to **71** are purposely left blank. To

see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# उपयोजित लेखन

Sample Content

## कृतिपत्रिका आराखडा – विभाग ५ -उपयोजित लेखन

**एकूण गुण २४**

**(अ ) पत्रलेखन**

औपचारिक किंवा अनौपचारिक **६ गुण**
मागणी/विनंती अभिनंदन

**किंवा**

अपठित गद्य उताऱ्याचे सारांशलेखन.
(विभाग – १ गद्य (प्र. क्र. १ (इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ सारांश लिहिणे.)

**(आ)** **१० गुण**

(१) जाहिरातलेखन (५० ते ६० शब्द)
(२) बातमीलेखन (५० ते ६० शब्द)
(३) कथालेखन (८० ते ९० शब्द)

} तिन्ही देणे त्यांपैकी २ लिहिणे अपेक्षित . (प्रत्येकी ५ गुण)

**(इ) लेखनकौशल्य** (१०० ते १२० शब्द) **८ गुण**

(१) प्रसंगलेखन
(२) आत्मकथन
(३) वैचारिक लेखन

} तीनपैकी १ लिहिणे अपेक्षित.

[महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४]

## कृतिपत्रिका प्रारूपाचे सविस्तर विवेचन – विभाग ५ - उपयोजित लेखन

**प्र.५. (अ) खालील कृती सोडवा.** **(६)**

कृतिपत्रिकेत उपयोजित लेखन विभागात **प्र. ५ (अ)** मध्ये प्रत्येकी **६** गुणांसाठी पत्रलेखनाची व सारांशलेखनाची कृती विचारली जाईल. यात विकल्प असेल. म्हणजेच, पत्रलेखन किंवा सारांशलेखन यांपैकी कोणतीही १ कृती सोडवणे अपेक्षित आहे.

**१. पत्रलेखन**

पत्रलेखनात औपचारिक पत्र व अनौपचारिक पत्र कृती स्वरूपात विचारली जातील. यांपैकी कोणतीही एक कृती सोडवणे अपेक्षित आहे. म्हणजेच, पत्रलेखनाच्या कृतीमध्ये अंतर्गत विकल्प आहे. औपचारिक पत्रासाठी मागणी किंवा विनंती व अनौपचारिक पत्रासठी अभिनंदन हे विषय असतील.

**लक्षात ठेवा.**

१. प्रश्न काळजीपूर्वक वाचून विषय समजून घ्या.
२. दिलेल्या विकल्पापैकी कोणत्या पत्रावर तुम्ही उत्तमप्रकारे लिहू शकता त्याचा विचार करून लिहा.

किंवा

**२. सारांशलेखन**

कृतिपत्रिकेतील गद्य विभागातील प्र. १ (इ) मधील अपठित उताऱ्याचा सारांश लिहिणे अपेक्षित आहे.

**प्र.५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(१०)**

कृतिपत्रिकेत उपयोजित लेखन विभागात **प्र.५ (आ)** मध्ये खालील तीन लेखनप्रकार विचारण्यात येतील. त्यांपैकी कोणत्याही दोन कृती सोडवणे अपेक्षित आहे.

१. जाहिरातलेखन २. बातमीलेखन ३. कथालेखन

प्रत्येक कृतीला पाच गुण असतील.

Sample Content

**१. जाहिरातलेखन**

यामध्ये दिलेल्या विषयावर जाहिरात लिहिणे अपेक्षित आहे. साधारणत: ५० ते ६० शब्दांत लिहिणे अपेक्षित आहे.

**२. बातमीलेखन**

यामध्ये दिलेल्या विषयावर बातमी लिहिणे अपेक्षित आहे. साधारणत: ५० ते ६० शब्दांची बातमी लिहिणे अपेक्षित आहे.

**३. कथालेखन**

कथालेखनासाठी पुढील प्रकारच्या कृती विचारल्या जाऊ शकतील.

१. मुद्द्यांवरून कथालेखन.

२. अपूर्ण कथा पूर्ण करणे.

- i. कथेचा पूर्वार्ध दिला असता उत्तरार्ध लिहिणे.
- ii. उत्तरार्ध दिला असता पूर्वार्ध लिहिणे.

८० ते ९० शब्दांची कथा लिहिणे अपेक्षित आहे.

**प्र.५. (इ) लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** (८)

कृतिपत्रिकेत उपयोजित लेखन विभागात कृती **५ (इ)** मध्ये ८ गुणांसाठी लेखनकौशल्य म्हणजेच निबंधलेखनाचा प्रश्न विचारण्यात येईल. यामध्ये खालील तीन लेखनप्रकारांचा समावेश होतो.

१. प्रसंगलेखन २. आत्मकथन ३. वैचारिक लेखन

हे तीनही लेखनप्रकार विचारले जातील. त्यांपैकी एक सोडवणे आवश्यक आहे. शब्दमर्यादा १०० ते १२० शब्दांची असते. या कृतींसाठी काही मुद्दे किंवा निवेदन, सूचनाफलक दिलेले असतात. त्याची मदत घेऊन लेखन करणे अपेक्षित असते.

Sample Content

# १ पत्रलेखन

### मार्गदर्शक सूचना

**कृतिपत्रिकेत उपयोजित लेखन विभागात प्र. ५ (अ) मध्ये प्रत्येकी ६ गुणांसाठी पत्रलेखनाची व सारांशलेखनाची कृती विचारली जाईल. यात विकल्प असेल. म्हणजेच, पत्रलेखन किंवा सारांशलेखन यांपैकी कोणतीही १ कृती सोडवणे अपेक्षित आहे. पत्रलेखनात कृती स्वरूपात दोन पत्रे विचारले जातील. यांपैकी कोणतीही एक कृती सोडवणे अपेक्षित आहे. म्हणजेच, पत्रलेखनाच्या कृतीमध्ये अंतर्गत विकल्प आहे.**

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात भ्रमणध्वनी, इंटरनेट, मेल यांचा वापर वाढल्यामुळे पत्रलेखनाचे प्रसंग बऱ्यात प्रमाणात कमी झाले आहेत. तरीही पत्रलेखन करण्याची गरज ही भासतेच; मात्र नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून पत्रलेखन करणे ही काळाची गरज आहे.

पत्रलेखन ही एक कला आहे. आपल्या मनातील विचार किंवा भावना चांगल्या शब्दांत मांडून दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे हे उत्तम लिखित साधन आहे. हे कसब मुलांनी नव्या युगाच्या नवीन तंत्रज्ञानानुसार आत्मसात करावे हा या अभ्यासघटकाचा उद्देश आहे. यासाठी इ-मेल पाठवण्याच्या पद्धतीनुसार पत्रलेखनाचे प्रारूप देण्यात आले आहे.

पत्रलेखनाचे दोन प्रकार आहेत. औपचारिक पत्रे व अनौपचारिक पत्रे. औपचारिक पत्रांमध्ये मागणी पत्र, विनंती पत्र, तक्रार पत्र, निमंत्रण पत्र, आभार पत्र इत्यादी प्रकारांचा समावेश होतो, तर अनौपचारिक पत्र हे आई, वडील, भावंडे, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी यांना लिहिले जाते.

यावर्षीच्या अभ्यासक्रमानुसार आपण खालील पत्रप्रकार अभ्यासू.

**पत्रलेखन**
- औपचारिक
  - कार्यालयीन व व्यावसायिक कामकाजानिमित्त पाठवले जाणारे पत्र
    - मागणी पत्र
    - विनंती पत्र
- अनौपचारिक
  - जवळच्या, जिव्हाळ्याचे नाते असणाऱ्या व्यक्तीला पाठवले जाणारे पत्र
    - अभिनंदन पत्र

### पत्रात समाविष्ट असलेल्या बाबी

| | औपचारिक | अनौपचारिक |
|---|---|---|
| १. | पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात दिनांक लिहावा. | पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात दिनांक लिहावा. |
| २. | प्रति, लिहून संबंधित व्यक्तीचा समर्पक हुद्दा नमूद करावा.<br>उदाहरणार्थ: मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडाधिकारी, सचिव, अध्यक्ष, व्यवस्थापक, संचालक, कार्यकारी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, कार्यकारी अभियंता इत्यादी. | व्यक्तीचा नात्याप्रमाणे व सन्मानपूर्वक योग्य उल्लेख करावा.<br>उदाहरणार्थ:<br>**नाते** — **मायना** — **अभिवादन**<br>आई/ वडील – तीर्थरूप } साष्टांग नमस्कार<br>काका/ काकू इत्यादी – तीर्थस्वरूप } साष्टांग नमस्कार<br>भावंडं – प्रिय — शुभाशीर्वाद |
| ३. | पत्राचा विषय लिहावा. | अनौपचारिक पत्राचा विषय लिहिण्याची गरज नसते. |
| ४. | पत्राचा आशय मोजक्या व अचूक शब्दांत मांडावा. | व्यक्तीचे कुशल विचारावे, भावना व्यक्त करणाऱ्या, जिव्हाळा दर्शवणाऱ्या भाषेचा वापर करावा. लेखन विस्तृत करावे. |
| ५. | शेवटी डावीकडे आपला विश्वासू, आपला कृपाभिलाषी इत्यादी शब्द लिहून खाली पत्र पाठवणाऱ्याचे नाव, पत्ता व इ-मेल आयडी टाकावा. | पत्राचा समारोप करताना डावीकडे योग्य मायना वापरावा व त्याखाली पत्र पाठवणाऱ्याचे नाव, पत्ता व इ-मेल आयडी टाकावा. |

[**टीप:** पत्राला उत्तर मिळणे आवश्यक असल्याने पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा लागतो. सर्व पत्रांची मांडणी इ-पत्रानुसार डाव्या बाजूस लिहिणे अपेक्षित आहे. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आता आवश्यकता भासत नाही. (इ-मेल लिहिताना पाकीट काढण्याची आवश्यकता नसते.)]

Sample Content

**पत्राचे प्रारूप**

दिनांक ________

प्रति, ________

माननीय ________ ,

विषय: ________

महोदय, ________

मुख्य मजकूर

आपला / आपली

__________

पत्ता

__________

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

**लक्षात ठेवा.**

१. प्रश्न काळजीपूर्वक वाचून विषय समजून घ्या.

२. तुम्ही निवडलेल्या विकल्पानुसार (औपचारिक किंवा अनौपचारिक) पत्राचे योग्य प्रारूप व भाषा वापरा.

३. कृतिपत्रिकेत प्रेषक व प्रति यांचे नाव दिले असल्यास दिलेले नावच वापरा. नाव दिले नसल्यास अ.ब.क वगैरे नाव वापरा.

४. कृतिपत्रिकेत पत्ते दिलेले असल्यास तेच पत्ते लिहा. पत्ते दिले नसल्यास काल्पनिक पत्ते लिहा.

## नमुना कृती

**१ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

आदर्श विद्यालय,
बोपर्डी, ता. वाई, जि. सातारा

**तालुकास्तरीय आंतरशालेय चित्रकला स्पर्धा**

स्पर्धा दोन गटांसाठी आयोजित

आकर्षक बक्षिसे

गट क्र. १ – इ. ५ वी ते इ. ७ वी
गट क्र. २ – इ. ८ वी ते इ. १० वी

प्रवेश नि:शुल्क

स्पर्धेचे ठिकाण – आदर्श विद्यालय, मुख्य सभागृह,
बोपर्डी, ता. वाई, जि. सातारा

दि. १४ नोव्हेंबर वेळ – सकाळी ९.00 ते ११.00

अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घ्यावा.

– मुख्याध्यापक

विद्यार्थी प्रमुख या नात्याने

तालुकास्तरावर आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित केल्याबद्दल मा. मुख्याध्यापक यांना त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

स्पर्धेत इ. १० वी – अ या वर्गातील वीस विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र मा. मुख्याध्यापकांना लिहा.

**[मार्च २०१९]**

Sample Content

**उत्तर:**

**१. अभिनंदन पत्र (औपचारिक)**

दिनांक: १५ नोव्हेंबर, २०२०

प्रति,
माननीय मुख्याध्यापक
आदर्श विद्यालय,
बोपर्डी, वाई,
सातारा - ××××××

**विषय:** तालुकास्तरावर आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित केल्याबद्दल अभिनंदन करण्याबाबत.

महोदय,

मी अ.ब.क, आपल्या शाळेचा विद्यार्थी प्रमुख या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपल्या शाळेने दिनांक १४ नोव्हेंबर रोजी तालुकास्तरीय आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचे आयोजित केले त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन. या स्पर्धेच्या आयोजनामुळे आपल्या तालुक्यातील सर्व चित्रकलाप्रेमी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले. त्यांच्या कलेला वाव देणारे एक व्यासपीठ तुम्ही त्यांना उपलब्ध करून दिलेत, याबद्दल आपले आभार. अभ्यासाबरोबरच कलागुणही महत्त्वाचे असतात हेही यामुळे सर्वांना पटले.

यापुढेही अशाच आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन आपली शाळा करत राहील असा मला विश्वास वाटतो.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क
विद्यार्थी प्रमुख
आदर्श विद्यालय,
बोपर्डी, वाई,
सातारा - ××××××
abc@gmail.com

**किंवा**

**२. विनंती पत्र (औपचारिक)**

दिनांक: १० नोव्हेंबर, २०२०

प्रति,
माननीय मुख्याध्यापक,
आदर्श विद्यालय,
बोपर्डी, वाई,
सातारा - ××××××

**विषय:** विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून घेण्याबाबत.

महोदय,

मी अ. ब. क., आपल्या शाळेचा विद्यार्थी प्रमुख या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. दि. १४ नोव्हेंबर या दिवशी आपल्या शाळेने तालुकास्तरीय आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहे. ही स्पर्धा इयत्ता ५ ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणार आहे. आपल्या शाळेतील इयत्ता '१० वी - अ' या वर्गातील वीस विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी व्हायचे आहे, तरीही आपण त्यांना सहभागी करून घ्यावे अशी मी आपणांस विनंती करतो. इच्छुक विद्यार्थ्यांची यादी वर्गशिक्षकांकडे देण्यात आली आहे.

या विनंतीला मान देऊन तुम्ही या वीस विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून घ्याल अशी मी आशा व्यक्त करतो.

कळावे,

Sample Content

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रमुख
आदर्श विद्यालय,
बोपर्डी, वाई,
सातारा - ××××××
abc@gmail.com

**२ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**'स्वच्छता हीच देशसेवा'**

दि. २ ऑक्टोबर

ज्ञानसंपदा विद्यालय, अकोला
स्वच्छता सप्ताहानिमित्त विशेष कार्यक्रम

वेळ स. ९:०० वाजता

'शालेय परिसर स्वच्छता'

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

स्वच्छता करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी करणारे पत्र तुमच्या शाळेतील ज्येष्ठ सेवकांना लिहा.

**[जुलै २०१९]**

**उत्तर:**

१. **अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**

दिनांक: १० ऑक्टोबर, २०२०

विद्यार्थी मित्रांनो,

सप्रेम नमस्कार! नुकताच आपल्या शाळेत स्वच्छता सप्ताह संपन्न झाला. या शालेय परिसर स्वच्छता अभियानामध्ये तुम्ही सर्वजण मोठ्या संख्येने सहभागी झालात त्याबद्दल तुमचे खूप खूप अभिनंदन!

स्वच्छतेचे महत्त्व या विषयावर आपण नेहमी वाचतो, निबंध लिहितो; पण ते प्रत्यक्षात आणणे खूप महत्त्वाचे असते. तुम्ही सगळ्यांनी या सप्ताहात सहभाग घेऊन, मेहनत करून आपली शाळा व परिसर स्वच्छ केलात. यामुळे, आपल्या परिसराचे रूपच बदलून गेले आहे. सर्व शिक्षकांनीही तुमचे याबद्दल खूप कौतुक केले.

हा असा सप्ताह दरवर्षी करावा असा विचारही तुम्ही मांडलात. तो नक्कीच स्तुत्य आहे.

पुन्हा एकदा तुमचे अभिनंदन! आपण सगळे ही स्वच्छतेची आवड कायम जपू आणि इतरांनाही प्रेरणा देऊ अशी माझी खात्री आहे.

तुमचा विद्यार्थी प्रतिनिधी व मित्र

अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी
ज्ञानसंपदा विद्यालय,
सेनापती बापट मार्ग,
अकोला - ××××××
abc@gmail.com

Sample Content

**किंवा**

**२. मागणी पत्र (औपचारिक)**

दिनांक: ३० सप्टेंबर, २०२०

प्रति,
माननीय श्री. मधुकर राहाळे,
ज्येष्ठ सेवक,
स्वच्छता विभाग
ज्ञानसंपदा विद्यालय,
सेनापती बापट मार्ग,
अकोला - ××××××

**विषय:** स्वच्छता साहित्याची मागणी करण्याबाबत.

महोदय,

मी अ. ब. क. आपल्या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपल्या शाळेमध्ये २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर स्वच्छता सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या स्वच्छता सप्ताहानिमित्त 'शालेय परिसर स्वच्छता' हा विशेष उपक्रम राबवण्यात येणार आहे. २ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजल्यापासून या स्वच्छता सप्ताहाची सुरुवात होईल. तरी शालेय परिसर स्वच्छतेसाठी आम्हांला काही साहित्याची आवश्यकता आहे. स्वच्छतेसाठी लागणाऱ्या साहित्याची यादी पुढीलप्रमाणे –

| क्र. | साहित्याचे नाव | नग |
|---|---|---|
| १. | झाडू | १० |
| २. | कचराकुंड्या | ५ |
| ३. | कुदळ | १० |
| ४. | घमेली | १० |
| ५. | हातमोजे आणि मास्क | १०० |

वरील सर्व साहित्य शाळेचा परिसर स्वच्छ करण्यासाठी लागणार आहे. तरीही लवकरात लवकर हे साहित्य उपलब्ध करून द्यावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी
ज्ञानसंपदा विद्यालय,
सेनापती बापट मार्ग,
अकोला - ××××××
abc@gmail.com

Sample Content

३ **खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**जीवनज्योती विद्यालय, नांदगाव**

कथाकथन स्पर्धा पारितोषिक
वितरण समारंभ

दि. २२ जुलै

वेळ : दुपारी ४ वाजता

प्रमुख पाहुणे – मा. श्री. अजय लागू
अध्यक्ष : मा. श्री. उत्तम कांबळे

संपर्क – jj22@gmail.com

दीपक/दीपाली माने

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

**किंवा**

| | |
|---|---|
| पारितोषिक प्राप्त विद्यार्थी सुहास/ सुनीता देसाई, यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. | पारितोषिक वितरण समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. उत्तम कांबळे यांना उपस्थित राहण्याची विनंती करणारे पत्र लिहा. |

**[मार्च २०२०]**

**उत्तर:**

१. **अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**

दिनांक: २३ जुलै, २०२०

प्रिय मित्र सुहास,

आपल्या शाळेत झालेल्या कथाकथन स्पर्धेत तुला प्रथम पारितोषिक मिळाले यासाठी सर्वप्रथम तुझे खूप खूप अभिनंदन मित्रा! मला खूपच आनंद झाला. सलग तिसऱ्या वर्षी तुला प्रथम पारितोषिक मिळाले आहे. तू निवडलेली कथा, ती कथा सादर करत असताना तुझा आत्मविश्वास, शब्दोच्चार, शब्दांच्या चढ-उताराची शैली सगळेच वाखाणण्याजोगे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. लागू सरांनी, तसेच अध्यक्ष मा. श्री. उत्तम कांबळे सरांनीही याचा उल्लेख करून तुझे कौतुक केले. तू सादर करत असलेल्या कथेत आम्ही श्रोतेसुद्धा रममाण झालो होतो. कथेतील पात्रे, प्रसंग अगदी आमच्या डोळ्यांसमोर उभे राहत होते. तुझ्या कथाकथनातील प्रगतीची ही पावतीच म्हणावी लागेल.

तुझ्या या यशाचे सर्वांनाच कौतुक वाटत आहे. आईबाबांनीही तुझे अभिनंदन केले आहे. तुझ्या पुढील वाटचालीसाठी तुला खूप खूप शुभेच्छा. पुन:श्च अभिनंदन.

तुझा मित्र,
दीपक माने
१५, साईधाम निवास,
म. गांधी मार्ग,
नांदगाव - ××××××
jj22@gmail.com

**किंवा**

२. **विनंती पत्र (औपचारिक)**

दिनांक: १८ जुलै, २०२०

प्रति,
माननीय श्री. उत्तम कांबळे,
१२, श्रीराम सोसायटी,
महावीर नगर,
चिपळूण - ××××××

**विषय:** पारितोषिक वितरण समारंभासाठी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहण्याबाबत.

Sample Content

महोदय,

मी दीपक माने, जीवनज्योती विद्यालय, नांदगाव या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने आपणांस हे पत्र लिहीत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आमच्या शाळेत कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी अध्यक्ष म्हणून आपण उपस्थित राहावे, अशी आम्हां सर्वांची इच्छा आहे.

दिनांक २२ जुलै रोजी दुपारी ४ वाजता होणाऱ्या या समारंभाचे अध्यक्ष म्हणून आपण उपस्थित राहावे, अशी मी आपणांस विनंती करतो. आपल्या उपस्थितीने आम्हां सर्व विद्यार्थ्यांना आपले मार्गदर्शन मिळेल.
आपण आमची ही विनंती मान्य करून या कार्यक्रमाची शोभा वाढवाल, अशी मी आशा करतो.

कळावे,

आपला विश्वासू,
दीपक माने
विद्यार्थी प्रतिनिधी
जीवनज्योती विद्यालय,
महात्मा गांधी मार्ग,
नांदगाव - ××××××
jj22@gmail.com

**४ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**शक्ती स्पोर्ट्स**
**मयूर कॉलनी, अकोला**
**सर्व शाळांसाठी १०% सवलतीच्या दरात खेळाचे साहित्य उपलब्ध**

दुकानाची वेळ
स. १०.०० ते रा. ८.००

सोमवारी बंद
E-mail-shaktisports08@gmail.com

व्यवस्थापक

अक्षय/अक्षदा चव्हाण
विद्यार्थी प्रतिनिधी-
न्यू इंग्लिश स्कूल, अकोला.
या नात्याने

शाळेसाठी क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र व्यवस्थापकांना लिहा.

**किंवा**

सवलतीच्या दरात खेळाचे साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल व्यवस्थापकांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**[जुलै २०२०]**

**उत्तर:**

१. **मागणी पत्र – (औपचारिक)**
दिनांक: ५ सप्टेंबर, २०१९
प्रति,
माननीय व्यवस्थापक
शक्ती स्पोर्ट्स,
मयूर कॉलनी,
अकोला - ××××××
shaktisports08@gmail.com

Sample Content

**विषय:** शाळेकरता क्रीडासाहित्याची मागणी करण्याबाबत.

महोदय,

मी अक्षदा चव्हाण, 'न्यू इंग्लिश' स्कूलची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या अनुमतीने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेसाठी काही क्रीडासाहित्याची आवश्यकता आहे. या आवश्यक साहित्याची यादी सोबत जोडत आहे. तरी आपण लवकरात लवकर हे साहित्य शाळेच्या पत्त्यावर पाठवावे ही विनंती.

सर्व शाळांना देण्यात येणारी १०% सवलत आपण द्यालच याची खात्री आहे; पण शाळेचे आपल्यासोबतचे अनेक वर्षांचे संबंध लक्षात घेऊन आपण जास्तीत जास्त सवलत द्यावी ही विनंती.

सोबत देयकही पाठवावे. योग्य त्या रकमेचा धनादेश त्वरित आपल्याला दिला जाईल.

| साहित्य | नग |
|---|---|
| फुटबॉल | ४ |
| क्रिकेट बॅट | ८ |

| साहित्य | नग |
|---|---|
| क्रिकेट बॉल | ४ |
| बॅडमिंटन रॅकेट | १० |

कळावे,

आपली विश्वासू,

अक्षदा चव्हाण

विद्यार्थी प्रतिनिधी

न्यू इंग्लिश स्कूल,

बावधान, दाते मार्ग,

अकोला - ××××××

xyz@gmail.com

**किंवा**

२. **अभिनंदन पत्र – (औपचारिक)**

दिनांक: १० सप्टेंबर, २०१९

प्रति,

माननीय व्यवस्थापक

शक्ती स्पोर्ट्स,

मयूर कॉलनी,

अकोला - ××××××

shaktisports08@gmail.com

**विषय:** सवलतीच्या दरात क्रीडासाहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल अभिनंदन करण्याबाबत.

महोदय,

मी अक्षदा चव्हाण, 'न्यू इंग्लिश' स्कूलची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या अनुमतीने आपणांस हे पत्र लिहीत आहे. मागील आठवड्यात आमच्या शाळेने आपल्या दुकानातून क्रीडासाहित्य मागवले होते. या साहित्यावर आपण खास १५% सवलत दिलीत. यामुळे, आम्ही मागवलेल्या साहित्यासोबत आम्ही विद्यार्थ्यांसाठी काही अधिकचे क्रीडासाहित्य मागवू शकलो. आपण दिलेल्या या खास सवलतीबद्दल आपले अभिनंदन व आभार.

आपल्यासोबतचा ऋणानुबंध भविष्यातही असाच टिकून राहील अशी आशा आहे.

कळावे,

आपली विश्वासू,

अक्षदा चव्हाण

न्यू इंग्लिश स्कूल,

अकोला - ××××××

xyz@gmail.com

Sample Content

**५ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

संत गाडगेबाबा विद्यालय,
संतभूमी चौक, अमरावती,
शाळेच्या 'विद्यार्थी मंडळ'
तर्फे आयोजित
'एकपात्री अभिनय स्पर्धा'
दि. 3 जानेवारी स. 11 वा.
sgbv.50@gmail.com
\- मुख्याध्यापक

अशोक/आशा पवार, विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

स्पर्धेसाठी शाळेचे सभागृह उपलब्ध करून देण्याची विनंती करणारे पत्र शाळेच्या मुख्याध्यापकांना लिहा.

**किंवा**

प्रथम पारितोषिक प्राप्त स्पर्धक स्वाती/सुयश देसाई यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**[मार्च २०२२]**

**उत्तर:**

१. **विनंती पत्र (औपचारिक)**

दिनांक: १ जानेवारी, २०२२

प्रति,
माननीय मुख्याध्यापक,
संत गाडगेबाबा विद्यालय,
संतभूमी चौक,
अमरावती - ××××××
sgbv.50@gmail.com

**विषय:** एकपात्री अभिनय स्पर्धेसाठी शाळेचे सभागृह मिळण्याबाबत.

माननीय महोदय,

मी अशोक पवार आपल्या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपल्या शाळेच्या विद्यार्थी मंडळातर्फे एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून यासाठी आपल्या शाळेचे सभागृह उपलब्ध करून द्यावे अशी मी आपणांस विनंती करतो.

ही स्पर्धा दि. ३ जानेवारी या दिवशी स. ११ ते दु. १:३० या वेळेत घेतली जाणार आहे. या स्पर्धेसाठी आपण आम्हांला सभागृह उपलब्ध करून द्याल, अशी आमची खात्री आहे.

आपला विश्वासू,
अशोक पवार
(विद्यार्थी प्रतिनिधी),
संत गाडगेबाबा विद्यालय,
संतभूमी चौक,
अमरावती - ××××××
इ-मेल: ashokpawar@gmail.com

**किंवा**

**२. अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**

दिनांक: ४ जानेवारी, २०२२

प्रिय. सुयश,

सर्वप्रथम तुझे मनापासून अभिनंदन! कालच्या एकपात्री अभिनय स्पर्धेत तुला प्रथम पारितोषिक मिळाले हे ऐकून आनंद झाला. प्रत्येकालाच तुझा अभिनय अतिशय आवडला. तुझी संवादफेक आणि त्यासोबत उत्तम अभिनयाची जोड याने कार्यक्रमाला रंगत आली.

सर्वांनाच तुला प्रथम पारितोषिक मिळावे असे वाटत होते आणि जेव्हा व्यासपिठावर तुझे नाव पुकारले गेले तेव्हा आम्हांला प्रचंड आनंद झाला. उत्तरोत्तर तुला असेच यश मिळो आणि भविष्यात तू एक प्रसिद्ध अभिनेता म्हणून नावारूपास येवो, हीच प्रार्थना. पुढील वाटचालीसाठी तुला खूप खूप शुभेच्छा.

तुझी मैत्रीण,
आशा पवार,
१२३ - पवार भवन,
विठ्ठलराव शिंदे मार्ग,
अमरावती - ××××××
ashapawar@gmail.com

**६ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**'झाडे लावा... झाडे जगवा'**

दिनांक ५ जून

**हिरवाई ट्रस्ट, तळेगाव दाभाडे**

'जागतिक पर्यावरण दिनानिमित्त'

रोपांचे मोफत वाटप

संपर्क– हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगाव दाभाडे

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.

**किंवा**

हिरवाई ट्रस्टच्या विश्वस्त पदी नियुक्ती झाल्याबद्दल चुलत भावाचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**उत्तर:**

**१. मागणी पत्र – (औपचारिक)**

दिनांक: ३ जून, २०२०

प्रति,

माननीय व्यवस्थापक

हिरवाई ट्रस्ट,

बालोद्यान मार्ग,

तळेगाव दाभाडे - ××××××

**विषय:** शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करण्याबाबत.

Sample Content

महोदय,

मी अ. ब. क., सरस्वती विद्यालय, वडगाव या विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने हे पत्र आपणांस लिहीत आहे. दि. ५ जून या दिवशी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आमच्या शाळेने उद्यानात रोपे लावण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. पर्यावरण संवर्धनामध्ये आपलाही हातभार लागावा या उद्देशाने आम्ही हा उपक्रम करू इच्छितो. रोपांच्या लागवडीसाठी आपल्या संस्थेकडून काही रोपांची मागणी करावयाची होती.

रोपांची यादी पुढीलप्रमाणे –

| क्र. | रोपे | नग/संख्या |
|---|---|---|
| १. | तुळस | २० |
| २. | गुलाब | १० |
| ३. | झेंडू | ५ |

| क्र. | रोपे | नग/संख्या |
|---|---|---|
| ४. | चाफा | ५ |
| ५. | मोगरा | ५ |

ही रोपे शाळेच्या उद्यानात लावायची आहेत. तरी रोपे लवकरात लवकर पाठवून आम्हांला सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

अ. ब. क.

विद्यार्थी प्रतिनिधी

सरस्वती विद्यालय,

श्री. राम रोड, वडगाव (प.)

पुणे- ××××××

abc@gmail.com

**किंवा**

२. **अभिनंदन पत्र – (अनौपचारिक)**

दिनांक: ६ जून, २०२०

प्रिय दादा,

अभिनंदन! अभिनंदन! हिरवाई ट्रस्ट या पर्यावरण संवर्धन करणाऱ्या संस्थेत तुझी विश्वस्त पदी नियुक्ती झाली यासाठी तुझे मनापासून अभिनंदन!

हिरवाई ट्रस्ट ही महाराष्ट्रातील पर्यावरण संवर्धनासाठी सतत प्रयत्नशील असणारी संस्था आहे. पर्यावरण संवर्धनाच्या विविध उपक्रमांत ही संस्था अनेक वर्षांपासून सहभाग घेत असते. आजच्या वर्तपानपत्रात तुझी या संस्थेच्या विश्वस्तपदी नियुक्ती झाल्याची बातमी तुझ्या फोटोसह झळकल्याचे पाहिले आणि मला मनापासून आनंद झाला.

तुझे झाडांविषयीचे प्रेम आम्हांला माहीत आहे. आजवर अनेक सामाजिक उपक्रमांत सहभागी होऊन तू वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाचे महत्त्व लोकांना पटवून दिले आहेस. भविष्यातही तू विविध सामाजिक उपक्रमांत सहभागी व्हावेस, ही सदिच्छा. तुझी तब्येत उत्तम आहे ना? काका-काकूंना साष्टांग नमस्कार सांग.

तुझा लहान भाऊ,

अ. ब. क.

राजा शिवछत्रपती वसतिगृह,

समर्थनगर,

कोल्हापूर- ××××××

abc@gmail.com

Sample Content

⑦ **खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**अ आ इ ई**

मराठी सुलेखन वर्ग

विनय ॲकॅडमीतर्फे

कालावधी
१ मे ते ३१ मे

सुलेखन वर्गाचे आयोजन

संपर्क: विनय गायकवाड
२, सोमवार पेठ, कराड.

माफक फी

भ्रमणध्वनी — ८८४४००१७००

**विद्यार्थी या नात्याने या वर्गात प्रवेश देण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहा.**

**किंवा**

**विनय ॲकॅडमीतर्फे आयोजित सुलेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल मित्राचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

१. **विनंती पत्र – (औपचारिक)**

दिनांक: २८ एप्रिल, २०२०

प्रति,
माननीय संचालक,
श्री. विनय गायकवाड,
२, सोमवार पेठ,
कराड - ××××××

**विषय:** मराठी सुलेखन वर्गात प्रवेश मिळण्याबाबत.

महोदय,

मी अ. ब. क., शारदा विद्यालय, कराड या शाळेतील विद्यार्थी आहे. आपण विनय ॲकॅडमीतर्फे मराठी सुलेखन वर्ग घेणार असल्याचे निवेदन वाचले. माझे मराठी हस्ताक्षर इतके चांगले नाही. त्यामुळे, मराठी विषयात मला कमी गुण मिळतात आणि माझे नुकसान होते. मला या शैक्षणिक वर्षात चांगले गुण मिळवायचे असल्याने मराठी हस्ताक्षर सुधारायचे आहे. तेव्हा मी या सुलेखन वर्गात प्रवेश घेऊ इच्छितो.

उन्हाळ्याच्या सुट्टीत आपण हे सुलेखन वर्ग घेत असल्याने या सुवर्णसंधीचा लाभ घेता यावा, अशी माझी इच्छा आहे. या वर्गात प्रवेश मिळाल्यास माझ्या हस्ताक्षरात नक्की सुधारणा होईल, अशी मला आशा वाटते. आपण मला मराठी सुलेखन वर्गात प्रवेश द्यावा, अशी मी आपणांस विनंती करतो.

कळावे,
आपला विश्वासू,
अ. ब. क.
समर्थ नगर,
कराड - ××××××
abc@gmail.com

Sample Content

**किंवा**

**२. अभिनंदन पत्र – (अनौपचारिक)**

दिनांक: १ जून, २०२०

प्रिय मित्र रोहन,

कसा आहेस? विनय ॲकॅडमीतर्फे आयोजित केलेल्या मराठी सुलेखन स्पर्धेत तुला प्रथम पारितोषिक मिळाल्याबद्दल तुझे मनापासून अभिनंदन! तुझे हस्ताक्षर पहिल्यापासून स्वच्छ, टापटीप आणि वळणदार आहे. वर्गातले शिक्षकही तुझ्या हस्ताक्षराचे कौतुक करतात. पाहताक्षणी कोणालाही त्या हस्ताक्षराचे अप्रूप वाटते. शाळेत हस्ताक्षर स्पर्धेत तुझा नेहमीच प्रथम क्रमांक येतो; पण विनय ॲकॅडमीने आयोजित केलेल्या स्पर्धेत संपूर्ण कराड शहरातील सर्व शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. त्या सर्वांमधून तू प्रथम क्रमांक मिळवलास, ही गोष्ट खूप कौतुकास्पद आहे.

असेच यश तुला मिळो, ही ईश्वरचरणी प्रार्थना. पुढील वाटचालीसाठी तुला खूप खूप शुभेच्छा.

तुझा मित्र,
अ. ब. क.
मुक्ताईनगर,
कराड - ××××××
abc@gmail.com

**८ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

जनता विद्यालय
अहमदनगर
आयोजित
जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा
दि. २ जानेवारी वेळ स. १०.०० वाजता.
संपर्क-मुख्याध्यापक, जनता विद्यालय,
अहमदनगर.
E-mail-janatavidya02@gmail.com
मोबाइल- ०२१११५५६६८०

अभय/आर्या दळवी, विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

स्पर्धेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा.

**किंवा**

उत्तम आयोजनाबद्दल मुख्याध्यापकांना अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**उत्तर:** **[मार्च २०२३]**

**१. विनंती पत्र (औपचारिक)**

दिनांक: ३१ डिसेंबर २०२२

प्रति,
माननीय मुख्याध्यापक,
जनता विद्यालय,
अहमदनगर - ××××××
janatavidya02@gmail.com

Sample Content

**विषय:** जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत प्रवेश मिळण्याबाबत.

माननीय महोदय,

मी आर्या दळवी. आपल्या विद्यालयाची विद्यार्थिनी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपल्या विद्यालयातर्फे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेची सूचना वाचली. आपल्या शाळेतर्फे मला या स्पर्धेत सहभागी होण्याची खूप इच्छा आहे. मी गावी गेले असल्याने मला ही सूचना उशिरा मिळाली. त्यामुळे, नावनोंदणी करायला उशीर झाला. माझे चित्रकलेतील प्रावीण्य मी वेळोवेळी दाखवून दिले आहे. अनेक चित्रकला स्पर्धांमध्ये मी पारितोषिके मिळवली आहेत. मला या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाली, तर मी तिचे नक्कीच सोनं करेन. माझी यामागची तळमळ लक्षात घेऊन आपण मला या स्पर्धेत सहभागी करून घेण्यास अनुमती द्यावी ही नम्र विनंती.

आपली विश्वासू,
आर्या दळवी
रमाई निवास,
अनुप मार्ग,
अहमदनगर - ××××××
aryadalavi@gmail.com

**किंवा**

२. **अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**

दिनांक: ३ जानेवारी, २०२३

प्रति,
माननीय मुख्याध्यापक,
जनता विद्यालय,
अहमदनगर - ××××××
इ-मेल: janatavidya02@gmail.com

**विषय:** उत्तम आयोजनाबद्दल अभिनंदन करण्याबाबत.

माननीय महोदय,

मी आर्या दळवी. आपल्या विद्यालयाची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपल्या विद्यालयातर्फे आयोजित जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा अतिशय उत्तमरित्या पार पडली. ही स्पर्धा, तिचे आयोजन इतके प्रभावी होते, की हा अनुभव आम्हां साऱ्यांच्याच कायम स्मरणात राहील हे निश्चित. या आयोजनाची जबाबदारी आपण स्वत: उचललीत आणि आपल्या मार्गदर्शनाने यशस्वीरित्या ही स्पर्धा पूर्ण झाली. त्याबद्दल आम्हां विद्यार्थ्यांतर्फे आपले खूप-खूप अभिनंदन.

आपले मार्गदर्शन आम्हां सर्वांना पुढेही असेच लाभेल असा विश्वास आहे. असे उत्तमोत्तम कार्यक्रम आपल्या विद्यालयात पुढेही आयोजित होतील याची खात्री आहे. आपल्या दीर्घ अनुभवाची छाप आयोजनातून दिसून आली. त्याबद्दल पुन्हा एकदा आपले मन:पूर्वक अभिनंदन!

आपली विश्वासू,
आर्या दळवी (विद्यार्थी प्रतिनिधी)
रमाई निवास,
जनता विद्यालय,
अहमदनगर - ××××××
janatavidyalayastudents@gmail.com

Sample Content

१ **खालील निवेदन वाचा व दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**'शारदाश्रम विद्यामंदिर' आयोजित आंतरशालेय निबंधस्पर्धा**
**जांभळी नाका, ठाणे (प.) - ४००६०१**
**परीक्षक – विजय देवरूखकर (प्रसिद्ध लेखक)**
२० ऑगस्ट -सकाळी १० वाजता

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने निबंधस्पर्धेसाठी परीक्षक म्हणून उपस्थित राहण्याची विनंती करणारे पत्र लिहा. | **किंवा** | निबंधस्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाल्याबद्दल मित्राचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. |

**उत्तर:**

१. **विनंती पत्र (औपचारिक)**

दिनांक: १६ ऑगस्ट, २०२०

प्रति,
माननीय श्री. विजय देवरूखकर,
१०२, राधाकृष्ण निवास,
नेमाडे मार्ग, मुलुंड,
मुंबई - ××××××

**विषय:** शारदाश्रम विद्यामंदिर आयोजित निबंधस्पर्धेत परीक्षक म्हणून उपस्थित राहण्याबाबत.

महोदय,

मी अ. ब. क., शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आंतरशालेय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. ठाणे शहरातील अनेक शाळांमधील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होतात. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंधांचे योग्य परीक्षण होणे गरजेचे असते. तेव्हा या निबंधस्पर्धेचे परीक्षण आपण करावे, अशी आम्हां सर्वांची इच्छा आहे.

दिनांक २० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता होणाऱ्या या स्पर्धेकरता आपण परीक्षक म्हणून उपस्थित राहावे, अशी मी आपणांस विनंती करतो. आम्ही सर्व विद्यार्थी आपले मार्गदर्शन मिळवण्यास उत्सुक आहोत. तेव्हा आमच्या विनंतीला मान देऊन आपण आपल्या उपस्थितीने या स्पर्धेची शोभा वाढवाल अशी मला आशा आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी
शारदाश्रम विद्यामंदिर,
जांभळी नाका,
ठाणे (प.) - ××××××
abc@gmail.com

**किंवा**

२. **अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**

दिनांक: २१ ऑगस्ट, २०२०

प्रिय अक्षय,

अभिनंदन दोस्ता! काल झालेल्या निबंधस्पर्धेत तुला प्रथम पारितोषिक मिळाले, यासाठी तुझे मनापासून अभिनंदन. या स्पर्धेचे परीक्षक विजय देवरूखकर यांनी तू लिहिलेल्या निबंधाचे खूप कौतुक केले. प्रसिद्ध लेखकांनी तुझ्या निबंधलेखनाचे कौतुक करणे यावरूनच तुझ्या लेखनाचा दर्जा किती उत्तम होता ते लक्षात येते. तू मिळवलेल्या यशाने मला फार आनंद झाला आहे.

Sample Content

निबंधात तू वापरलेली सुभाषिते, तुझी लेखनशैली, प्रभावी भाषा, तुझ्या निबंध विषयाची हाताळणी अतिशय उत्तम होती. तुझ्या यशाचे सर्वांनाच कौतुक वाटत आहे. आईबाबांनीही तुझे अभिनंदन केले आहे. भविष्यातही तुला असेच यश मिळावे आणि लेखक म्हणून प्रसिद्धी मिळावी, यासाठी खूप खूप शुभेच्छा.

तुझा मित्र,
अ. ब. क.
साईधाम सोसायटी,
स्टेशन रोड, नौपाडा,
ठाणे - ××××××
abc@gmail.com

**१० खालील निवेदन वाचा व दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**सुबोध विद्यालय, ठाणेतर्फे आयोजित**
**आंतरशालेय विज्ञान प्रकल्प स्पर्धा आणि प्रदर्शन**
दि. २० नोव्हेंबर स्थळ – शाळेचे सभागृह
सकाळी – ११ वाजता.

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने शाळेच्या मुख्याध्यापकांना विज्ञान प्रयोग साहित्यांची मागणी करणारे पत्र लिहा.

**किंवा**

विज्ञान प्रकल्प स्पर्धेची परीक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल तुमच्या मावशीचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**उत्तर:**

१. **मागणी पत्र (औपचारिक)**

दिनांक: १८ नोव्हेंबर, २०२०

प्रति,
माननीय मुख्याध्यापक,
सुबोध विद्यालय, ठाणे

**विषय:** विज्ञान प्रयोग साहित्यांची मागणी करण्याबाबत.

महोदय,
मी अ. ब. क. आपल्या शाळेचा विद्यार्थी-प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. दि. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या आंतरशालेय विज्ञान प्रकल्प स्पर्धेत आम्ही विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे. त्यासाठी काही विज्ञानप्रयोग साहित्यांची आवश्यकता होती. हे साहित्य उपलब्ध झाल्यास आम्हांला स्पर्धेत विज्ञान प्रयोगाचे प्रात्यक्षिक दाखवता येईल. विज्ञान प्रयोग साहित्याची यादी पुढीलप्रमाणे –

| क्र. | साहित्याचे नाव | नग |
|---|---|---|
| १. | सूक्ष्मदर्शिका | २ |
| २. | परीक्षानळी | १० |
| ३. | मोजपात्र | २ |

| क्र. | साहित्याचे नाव | नग |
|---|---|---|
| ४. | बर्नर | २ |
| ५. | चंचुपात्र | ५ |

या यादीतील सर्व वस्तू प्रयोगाच्या दृष्टीने गरजेच्या आहेत. तरी आपण हे विज्ञान प्रयोग साहित्य लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी
सुबोध विद्यालय,
ठाणे - ××××××
abc@gmail.com

Sample Content

किंवा

**२. अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**

दिनांक: २१ नोव्हेंबर, २०२०

तीर्थस्वरूप आराध्या मावशीस,

सप्रेम नमस्कार! सर्वप्रथम तुझं मनापासून अभिनंदन! काल आमच्या सुबोध विद्यालयातर्फे आयोजित केलेल्या विज्ञान प्रकल्प स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून तू आलीस आणि मला आश्चर्याचा सुखद धक्का बसला. आंतरशालेय विज्ञान प्रकल्प स्पर्धेचे परीक्षक म्हणून निवड होणे ही किती मानाची गोष्ट आहे, हे मला माहीत आहे. तुझं किती अभिनंदन करू असं मला झालं आहे.

तुझ्या क्षेत्रातील तुझ्या संशोधनाबद्दल आईने मला सांगितले होते. आम्हांला त्याचे अप्रूप वाटतेच; पण विज्ञान क्षेत्रात तुला मिळणारे सन्मान पाहून मी तुझा भाचा आहे याचा अभिमानही वाटतो. काल तू केलेल्या परीक्षणाबद्दलही आमचे मुख्याध्यापक खूप कौतुकाने बोलत होते. मला खूपच आनंद होत होता.

तू कामात गुंतलेली असल्यामुळे मी तिथे तुला भेटू शकलो नाही. तुम्ही सर्व खुशाल आहात अशी आशा करतो. आई-बाबांनीही तुला शुभेच्छा दिल्या आहेत. विज्ञान क्षेत्रातली तुझी वाटचाल अशीच चालू राहील अशी सदिच्छा.

तुझा भाचा,
अ. ब. क.
५०२, राधाकृष्ण निवास,
राम-मारुती मार्ग,
ठाणे - ××××××
abc@gmail.com

## सराव कृती

१

**निसर्ग मित्र टूर्स, बुलढाणातर्फे**
**लोणार अभयारण्य एकदिवसीय सहल**

- प्रशिक्षित मार्गदर्शक
- वाजवी शुल्क

शालेय सहलींवर २०% सवलत.

- विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांना लोणार अभयारण्यात एकदिवसीय सहल नेण्याची विनंती करणारे पत्र लिहा.
- तुमच्या मित्राने या सहलीदरम्यान काढलेल्या छायाचित्राला जिल्हास्तरीय छायाचित्रण स्पर्धेत पहिले बक्षीस मिळाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करा.

२

**तरुण उत्कर्ष मित्रमंडळ आयोजित**
**रक्तदान शिबिर**

दिनांक : २ ऑक्टोबर
वेळ : सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजता.
संपर्क: श्री. अनिल गाडगीळ, विश्वस्त, तरुण उत्कर्ष मंडळ,
५१० हरिकृपा, मिरज, सांगली.

- स्वयंसेवक म्हणून रक्तदान शिबिरामध्ये सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र विश्वस्तांना लिहा.
- तुमच्या भावाच्या मंडळाने आयोजित केलेले रक्तदान शिबिर यशस्वी झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

Sample Content

३

**अभिनव कलामंदिर आयोजित**
**ओरिगामी कार्यशाळा व स्पर्धा**

- कागदापासून सुंदर वस्तू बनवण्याचे प्रशिक्षण.
- खास विद्यार्थ्यांसाठी १ मे ते ८ मे कार्यशाळा.

कार्यशाळेसाठी लागणारे साहित्य हवे असल्यास त्वरित तुमची मागणी नोंदवा.

संपर्क: श्री. नरेश कोकणे, संचालक, अभिनव कलामंदिर
२, हरिसिंग आर्केड, महात्मा गांधी मार्ग, लातूर.

**तुम्ही व तुमचे मित्र या कार्यशाळेत सहभागी होणार आहात. त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**तुमच्या मित्राचा ओरिगामी स्पर्धेत पहिला क्रमांक आल्याबद्दल त्याचे अभिनंदन करा.**

४

**वाळके स्पोर्टस्**
**गिर्यारोहणासाठी लागणारे साहित्य उपलब्ध**

- विविध प्रकारच्या बॅकपॅक्स
- तंबू – (दोन माणसांसाठी, तीन माणसांसाठी, सहा माणसांसाठी)
- हलके; पण मजबूत दोर
- टोप्या
- उत्तम प्रतीचे बूट
- जलरोधक पिशव्या
- स्लीपिंग बॅग
- इतर अनेक प्रकारचे साहित्य

संचालक : संदीप वाळके, गिर्यारोहक.

तुम्हांला गिर्यारोहणासाठी लागणारे साहित्य मागवण्यासाठी दुकानाच्या संचालकांना पत्र लिहा.

तुमचे मामा श्री. संदीप वाळके यांना उत्कृष्ट गिर्यारोहक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

५

**सरस्वती कलामंदिर आयोजित**
**गीतगायन स्पर्धा**

दिनांक :२९ फेब्रुवारी

वेळ : सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजता.

स्थळ : सरस्वती कलामंदिराचे सभागृह

वयोमर्यादा: गट १ : ५ वर्षे ते १० वर्षे

गट २ : ११ वर्षे ते १८ वर्षे

गट ३ : १८ वर्षांपासून पुढे

संपर्क : श्रीमती लता फडके, संचालिका, सरस्वती कलामंदिर,
४०५, आनंदवन, नागपूर.

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने गीतगायन स्पर्धेत तुमच्या शाळेतील काही विद्यार्थ्यांचे नाव नोंदवण्याची विनंती करणारे पत्र लिहा.

तुमच्या मैत्रिणीचा गीतगायन स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

Sample Content

# AVAILABLE NOTES FOR STD. X:
(Eng., Mar. & Semi Eng. Medium)

## PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

## PRECISE SERIES
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)
- History, Political Science and Geography

## PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

## Additional Titles: (Eng., Mar. & Semi Eng. Med.)
- Grammar & Writing Skills Books (Std. X)
  - Marathi • Hindi • English
- Hindi Grammar Worksheets
- 3 in 1 Writing Skills
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- 3 in 1 Grammar (Language Study) & Vocabulary
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions
- आमोद:(सम्पूर्ण-संस्कृतम्) – SSC 11 Activity Sheets With Solutions
- हिंदी लोकवाणी (संयुक्त), संस्कृत-आनन्द: (संयुक्तम्) – SSC 12 Activity Sheets With Solutions
- IQB (Important Question Bank)
- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book
- A Collection of Board Questions With Solutions




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of STATIONERY

Visit Our Website